# नगर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि.,अहमदनगर

(मल्टीस्टेट शेड्यूल्ड) (अवसायनांतर्गत)

बँक रोड,पोस्ट बॉक्स नंबर-७, अहमदनगर-४१४००१

Email - recovery@nucb.in Website-www.nucb.in, Ph-0241-2343641/42,Fax No.2346951


# Re-Tender Notice

## सरफेसी ॲक्ट २००२ अंतर्गत मालमत्ता पुर्नविक्री करण्यासाठी मोहोरबंद निविदा मागवणे तसेच कर्जदार यांचेसाठी सूचना

### सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फिनान्शियल ॲसेट ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट (सरफेसी) ॲक्ट २००२ नुसार मालमत्तेची विक्री

वरिल ॲक्ट कलम १३ (४) नुसार जारी करण्यात आलेल्या सुचनेनंतर ,खाली नमूद करण्यात आलेल्या मालमत्तेचा नगर अर्बन को-ऑप.बँक लि.,(मल्टी-स्टेट शेडयुल्ड बँक) अहमदनगर यांच्यावतीने बँकेच्या अधिकृत अधिकारी यांनी सदर ॲक्टच्या कलम ८ व ९ नुसार बँकेची नजर गहाण कर्जाची दि.: ३१/०५/२०१७ ची येणेबाकी रक्कम रु. ६,३१,९८५.५०/- (अक्षरी रु.सहा लाख एकतीस हजार नउशे पंच्याऐंशी रूपये पन्नास पैसे फक्त) व दि. ०१/०६/२०१७ पासून त्यावरील होणारे व्याज तसेच कायदेशीर खर्च इतकी रक्कम कर्जदार /जामिनदार यांच्याकडून वसूल करण्यासाठी खाली नमुद केलेल्या मालमत्तेची 'जशी आहे आणि जिथे आहे, ज्या स्थितीत व जे आहे.'या तत्वावर विक्री करण्यासाठी मोहोरबंद निविदा मागवित आहे. सदरही विक्री सरफेसी ॲक्ट / रुल्स प्रमाणे खाली नमूद केलेल्या अटीनुसार होईल.

कर्जदार यांचे अचल मालमत्तेचा तपशील खालील प्रमाणे:-

| कर्जदाराचे व जामिनदाराचे नाव, पत्ता, शाखा | मिळकतीचा तपशील | राखीव किंमत बयाणा रक्कम १०% |
|---|---|---|
| कर्जदार- मे.नेहा इंटरप्रायझेस, प्रोप्रा. श्री गोगड सनी गौतमचंद, पत्ता- बालाजी रेसिडेन्सी, मुंडे नगर नवीन बस स्टँण्ड जवळ,पाथर्डी, ता.- पाथर्डी, जि.-अहमदनगर.<br>जामीनदार- १) श्री.संदीप गंगाबिसन बजाज, पत्ता - माणिक दौंडी,नगर रोड,पाथर्डी, ता.- पाथर्डी, जि.-अहमदनगर.<br>२) श्री.सुनिल माणकचंद भंडारी, पत्ता- मेन रोड, पाथर्डी, ता.- पाथर्डी,जि.-अहमदनगर.<br>३) सौ.लता गौतमचंद गोगड, पत्ता- बालाजी रेसिडेन्सी ,मुंडे नगर नवीन बस स्टँण्ड जवळ,पाथर्डी, ता.- पाथर्डी, जि.-अहमदनगर.<br>शाखा:- पाथर्डी | डि अहमदनगर, सब डि व ता. पाथर्डी पैकी मौजे माळी बाभुळगांव व अहमदनगर, जिल्हा परिषद हद्दीतील वर्णनाची मिळकत गट नं.७४ पै प्लॉट नं ८७ याचे क्षेत्रफळ १००.०८ चौ.मी.,यापैकी पुर्वेकडील १/२ (निम्मा) प्लॉट, याचे क्षेत्रफळ ५०.०४ चौ.मी. याची लांबी दक्षिण - उत्तर ९.०० मी. व रुंदी पुर्व-पश्चिम ५.६ मी. याचा ग्रामपंचायत मिळकत नं. ६७७/२ असा आहे. याची चतु:सिमा खालीलप्रमाणे :- पुर्वेस:- प्लॉट नं. ८८ दक्षिणेस:- रस्ता पश्चिमेस:- प्लॉट नं. ८७ पैकी राहीलेला निम्मा प्लॉट उत्तरेस:- प्लॉट नं. ७८ | राखीव किंमत -<br>रु. २,५३,४००/-<br><br>बयाणा रक्कम १०%<br>रु. २५,३४०/- |

१) मोहोरबंद निविदा पध्दतीने विक्री करावयाची उपरोक्त 'मालमत्ता जशी आहे आणि जिथे आहे, ज्या स्थितीत व जे आहे.' या अटीवर व ज्यास कोणतीही हमी, खात्री, बंधन, जबाबदार वा प्रतिनिधीत्वाशिवाय असलेल्या तत्वावर विक्री करण्यात येईल. सदर अचल मालमत्तेचे क्षेत्रफळ इत्यादीबाबत कोणतीही हमी,खात्री,जबाबदारी इत्यादीबाबत बँकेचे अधिकृत अधिकारी जबाबदार असणार नाहीत. यशस्वी निविदाधारकांच्या नावानेच सेल सर्टीफिकेट दिले जाईल.

२) सदरील मालमत्ता राखीव किंमतीपेक्षा कमी किंमतीत विक्री केली जाणार नाही.

३) मोहोरबंद निविदा सोबत १० % म्हणजे रक्कम रुपये २५,३४०/- या बयाणा रकमेचा भरणा आरटीजीएस द्वारे 'नगर अर्बन को-ऑप.बँक लि.,अहमदनगर' या नावाने प्रधान कार्यालय, अहमदनगर येथे जमा करणे आवश्यक आहे. अयशस्वी निविदाधारकांना बयाणा रक्कम परत करण्यात येईल. बयाणा रकमेवर व्याज देण्यात येणार नाही.

४) निविदा दाखल करण्याची अंतिम तारिख २५/०७/२०२४, दुपारी ५.०० वाजेपर्यंत आहे. निविदा प्राधिकृत अधिकारी यांचेकडे बँकेच्या प्रधान कार्यालय, अहमदनगर या ठिकाणी दाखल कराव्यात.

५) यशस्वी निविदा धारकास खरेदी रकमेच्या २५% रक्कम (आधी जमा केलेल्या बयाणा रकमेसह) मोहोरबंद निविदा प्रक्रिया समाप्त झाल्यावर त्याच दिवशी किंवा त्याच्या दुस-या दिवशी जमा करावी लागेल. उर्वरीत रक्कम विहित वेळेत जमा करण्यात कसूर झाल्यास आधी जमा केलेली रक्कम एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट (सरफेसी) ॲक्ट २००२ च्या रुल ९ मधील सबरुल ५ नुसार जप्त करून मालमत्तेची पुर्न:विक्री केली जाईल.

६) सदर विक्री ही बँकेच्या पुष्टीवर अवलंबून आहे. जर कर्जदार/जामीनदाराने विक्री तारखेच्या आधी बँकेस येणे असलेल्या संपूर्ण रकमेची परतफेड केल्यास,कोणतीही विक्री प्रक्रीया करण्यात येणार नाही.

७) टेंडर उघडण्याचे दिवशी अधिकृत अधिकारी सर्वोच्च निविदा भरणा-या निविदा धारकास यशस्वी घोषित करतील. निविदा राखीव निधीपेक्षा जास्त असणे आवश्यक आहे. निविदा रक्कम वाढविण्यासाठी बोली लावण्यात येणार नाही. यशस्वी निविदाधारकांस मालमत्ता स्वत:च्या नावावर करून घेण्यासाठी लागणारा खर्च उदा.-मुद्रांक शुल्क,नोंदणी शुल्क व तदनुषांगिक इतर खर्च भागविण्याची जबाबदारी खरेदीदाराची राहील.

८) बँकेकडून विक्रीचे प्रमाणपत्र दिले जाताच विक्रीची पुर्तता होईल व कोणताही दावा बँक स्विकारणार नाही.

९) मालमत्तेची विक्री करणेसाठी बँकेचे वतीने कोणतेही वचन किंवा निवेदन या सुचनेत समाविष्ठ नाही.व उल्लेखित नाही.कोणतेही कारण अथवा कोणतीही पूर्वसूचना न देता कोणतीही निविदा स्वीकारणे,नाकारणे,विक्री स्थगित करणे,पुढे ढकलणे अथवा विक्रीच्या अटी व शर्तीमध्ये बदल करण्याचा अधिकार खालील सही करणार यांनी राखून ठेवलेला आहे. त्यास निविदादार आव्हान देऊ शकणार नाही.

१०) वीज बिल, पाणी बिल, स्टॅम्प डयुटी, सेल सर्टीफिकेट, रजिस्ट्रेशन चार्जेस वा इतर कुठल्याही प्रकारचे शासकीय ,निमशासकीय कर-उपकर इत्यादी देणी (सध्याची व भविष्यात निर्माण होणारी सर्व देणी) भागविण्याची जबाबदारी खरेदीदाराची राहिल. या व्यतिरिक्त सिटी सर्व्हे किंवा ७/१२ उता-यावर नोंदविलेले बोजे भागविण्याची जबाबदारीही खरेदीदाराची राहील.(कोणतीही देणी देण्याची जबाबदारी अधिकृत अधिका-याची राहणार नाही.)

११) मालमत्ता नावावर ट्रान्सफर करून घेणेसाठी कायदेशीर दृष्टिकोनातून सर्व प्रकारचा खर्च स्वत: खरेदीदाराला करावा लागेल.

१२) पुढील तपशील /चौकशी/विक्रीच्या अटी व शर्तीसंबंधी तपशील नगर अर्बन को ऑप बँक लि.,अहमदनगर यांचे प्रधान कार्यालय येथे अधिकृत अधिकारी यांचेकडे मिळेल. कोणतेही कारण न देता कोणताही किंवा सर्व प्रस्ताव स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार खाली सही करणार यांनी राखून ठेवला आहे. विक्री सुरक्षित धनकोच्या मान्यतेच्या अधीन राहील.

१३) सदर मालमत्ता विक्रीचा निविदा फॉर्म बँकेच्या प्रधान कार्यालयात बँकेच्या कामकाजाच्या दिवशी व वेळेत दि.०६/०७/२०२४ पासून दि.२५/०७/२०२४ पर्यंत (सुट्टीचे दिवस वगळून) दुपारी ५.०० वाजेपर्यत मिळेल. निविदा फॉर्मची किंमत रु.१००/- अधिक जी.एस.टी.सह विनापरतावा राहील.

<u>कर्जदार /जामिनदार यांना बँकेची सूचना :-</u> सदर सुचना ही वर नमूद केलेल्या खात्याचे कर्जदार / जामिनदार यांच्यासाठी सुध्दा आहे. कृपया यांची नोंद घ्यावी की,आपण बँकेकडून घेतलेल्या कर्जाबाबत परतफेड करण्यात कसूर केली आहे. त्यामुळे बँकेने आपणा सर्वांना वर नमुद केलेली रक्कम ६० दिवसाच्या आत परत करण्यास कलम १३ (२) नुसार सूचना जारी केल्या होत्या. आपण ६० दिवसांची मुदत संपल्यावर सुध्दा ही रक्कम परतफेड केलेली नाही. त्यामुळे अधिकृत अधिकारी यांनी कलम १३(४) नुसार मिळालेल्या अधिकाराचा वापर करून सदर कर्जापोटी गहाणखत करून दिलेल्या मालमत्तेचा दि.१७/०६/२०२३ रोजी प्रत्यक्ष ताबा घेतला आहे. यानुसार सुचना देण्यात येते की, वर नमूद केलेप्रमाणे रक्कम विक्रीच्या तारखेआधी जमा करावी. त्यास कसूर झाल्यास मालमत्तेची विक्री करण्यात येईल आणि जर काही बाकी राहिल्यास ती आपणाकडून व्याज आणि खर्चासह वसूल करण्यात येईल. कृपया याची नोंद घ्यावी की सदर मागणी सूचना, ताबा घेणे, मूल्यांकन आणि विक्री इ. खर्च अधिकृत यांनी मालमत्तेची विक्री केलेनंतर त्या रकमेतून वसूल करण्यात येईल. आणि विक्रीची उर्वरित रक्कम आपले वर नमुद केलेल्या रकमेत समायोजित करण्यात येईल. आपणास बयाणा रकमेच्या अटी व शर्तीच्या अधीन राहून या लिलाव प्रक्रियेस उपस्थित राहण्याची मुभा आहे.

ठिकाण- अहमदनगर

दिनांक- ०६/०७/२०२४

प्राधिकृत अधिकारी

नगर अर्बन को.-ऑप. बँक लि.(मल्टीस्टेट शेड्यूल्ड),(अवसायनांतर्गत),अहमदनगर

ARL